महाराष्ट्र शासन

**कार्यालय, विभागीय सह संचालक (उच्च शिक्षण) नांदेड विभाग,**

व्हीआयपी रोड-आनंद नगर रोडवर, दत्त मंदिरजवळ, दयानंद नगर, **नांदेड**-431602

Website: jdhenanded.info ☎ 02462-283144 E Mail : jdhe.nanded@yahoo.co.in

जाक्र. विशिससं/उशि/नांवि/अनु.2/ /23, 1007 दिनांक : 08.03.2023

प्रति,

कुलसचिव,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,

नांदेड

आ. क्र... 1882 ... दि. 08/3/2023
शैक्षणिक (मान्यता) विभाग
स्वा. रा. ति. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

विषय : दिनांक 14.06.2006 पूर्वी नियुक्त एम.फील. अर्हताधारक अध्यापकांना कॅसचे लाभ लागू करण्याबाबत

संदर्भ : उच्च शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक विशि-1/1747, दिनांक 17.02.2023

महोदय,

विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक 05.09.2022 रोजीच्या पत्रान्वये विहीत निवड समितीच्या माध्यमातून दिनांक 14.06.2006 पूर्वी नियुक्त झालेल्या व ज्यांनी सेवेत असताना, दिनांक 01.01.1994 ते 11.07.2009 या कालावधीत एम. फील. ही शैक्षणिक अर्हता धारण केली आहे, तसेच ज्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने एम.फील. अर्हतेच्या आधारे नेट मधून सूट दिलेली आहे व विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेली आहे, असे अध्यापक एम.फील. अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीसाठी पात्र आहेत, असे कळविलेले आहे. त्या अनुषंगाने असे स्पष्ट करण्यात येते की, दिनांक 14.06.2006 पूर्वी ज्या अध्यापकांनी सेवेत असताना एम. फील. अर्हता धारण केली असेल, तसेच ज्या अध्यापकांनी दिनांक 14.06.2006 पूर्वी नियुक्तीवेळी एम. फील. अर्हता धारण केली होती, अशा अध्यापकांची नियुक्ती जर विहीत निवड समितीच्या माध्यमातून झाली असेल तसेच अशा अध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने एम. फील. अर्हतेच्या आधारे नेट परीक्षेमधून सूट देऊन त्यांच्या नावासहित तसे संबंधित विद्यापीठांना कळविलेले असेल व विद्यापीठाने नियमित स्वरुपात मान्यता दिलेली असेल, तर (1) ज्या अध्यापकांनी नियुक्तीपूर्वी एम.फील. अर्हता धारण केली असेल, त्यांना नियुक्तीपासून व (2) ज्यांनी सेवेत असताना एम.फील. अर्हता धारण केली असेल, त्यांना सदर अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ देय राहतील.

याप्रमाणे खात्री करुन पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

RM Dhaigude

(डॉ. रामकृष्ण धायगुडे)
विभागीय सह संचालक

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जा.क्र.शैक्ष/मान्यता/२०२२–२३/ 1457 दिनांक २३/०३/२०२३

प्रति,
मा.प्राचार्य
सर्व संलग्नीत अशासकीय अनुदानित महाविद्यालये
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : दिनांक १४/०६/२००६ पूर्वी नियुक्त एम.फील अर्हताधारक अध्यापकांना कॅसचे लाभ लागू करण्याबाबत...

संदर्भ : १) उच्च शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.विशि–१/१७४७, दिनांक १७/०२/२०२३
२) विभागीय सहसंचालक नांदेड कार्यालयाचे पत्र क्र.विशिससं/उशि/नांवि/अनु.२/१००७, दिनांक ०८/०३/२०२३

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भीय शासन आदेशाच्या अनुषंगाने पुढील योग्य ती आवश्यक कार्यवाही आपल्या स्तरावरून करण्यात यावी, कळावे.

उपकुलसचिव
शैक्षणिक (मान्यता) विभाग